


# डॉ. ज्योतिष मित्र मिलिंद (पुणे)

## ज्योतिष अभ्यास, मार्गदर्शन आणि समुपदेशन

संपर्क : ७०५८११५९४७ वेब : www.jyotishmitramilind.in

राशी चक्रातील १२ राशींचे वर्गीकरण व प्रभाव (भाग १)

पृथ्वीच्या आसपासचे वातावरण आहे त्याभोवती ३६० अंशांत सर्व ग्रह एका काल्पनिक पट्टीमध्ये फिरताना दिसतात. जो राशीमार्ग आहे. हा तो मार्ग हे ज्यामध्ये पृथ्वीवरून पाहिल्यास सूर्य पृथ्वीच्या आसपास फिरताना दिसून येतो, यास क्रांती वृत्त म्हणतात.
राशि चक्र सारख्या १२ भागामध्ये विभाजित केले आहे, सोयीसाठी त्यातल्या पहिल्या भागाला मेष, दुसरे भागास वृषभ या प्रमाणे (१) मेष, (२) वृषभ, (३) मिथुन, (४) कर्क, (५) सिंह, (६) कन्या, (७) तुळ (८) वृश्चिक, (९) धनु, (१०) मकर, (११) कुंभ, (१२') मीन अशा १२ राशी आहेत.
प्रत्येक सौर्यमान किंवा राशि ठीक-ठीक ३० अंशाचा असतो. राशिचक्रातील प्रत्येक राशिच्या नावाची उत्पत्ति, या मध्ये असलेल्या नक्षत्र समूहाच्या तुलनेनुसार केलेली आहे.

या राशींच्या जड़ किंवा चेतन पदार्थावर पडणाऱ्या प्रभावाच्या आधारावर स्थूल प्रमाणात १३ विभागात वर्गीकरण केले जाऊ शकते.
(१) सकारात्मक व नकारात्मक राशि
(२) उत्तरी व दक्षिणी राशी, विषुवीय राशि, अयन वृत्तिय राशि
(३) अग्नी, पृथ्वी, वायु, जल राशि
(४) चर, स्थिर व उभय राशि
(५) फलदायी व निष्फल राशी
(६) मूक राशि
(७) हिंसक राशि
(८) मानवीय राशि
(९) स्वर राशि
(१०) चतुष्पाद राशि
(११) द्विसंख्या राशि

(१२) द्वि तनु राशि

(१३) लघु व दीर्घ उदित राशि

(१) सकारात्मक व नकारात्मक राशि :

| क्र. | वर्गीकरण | माहिती | वैशिष्ट्ये |
|---|---|---|---|
| १अ. | सकारात्मक राशि | मेष राशिच्या क्रमानुसार एक आड एक राशि सकारात्मक व नकारात्मक राशि गणल्या जातात. काही स्थानी पुरुष राशि, दिवस राशि म्हटले जाते. अश्या प्रकारे मेष, मिथुन, सिंह, तुळ, धनु, कुंभ या विषम राशि सकारात्मक राशि आहेत | सकारात्मक राशि निश्चित, दृढ, उद्बोधक, आत्मसूचक, क्रियाशील व आक्रमक प्रवृत्ति दर्शवतात. निश्चयता, आत्मबल, व शक्ति प्रदान करतात. सकारात्मक राशि बाह्यगामी व स्वच्छंद असतात. |
| १ब. | नकारात्मक राशि | काही स्थानी स्त्री राशि, रात्रि राशि म्हटले जाते.<br>सम राशि वृषभ, कर्क, कन्या, वृश्चिक, मकर व मीन या नकारामक राशि आहेत. | नकारात्मक राशि निष्क्रीय, भावुक, शांत, रक्षात्मक व सांत्वनात्मक प्रवृत्ति दर्शवतात. नकारात्मक राशी कमी बाह्यगामी व कमी स्वच्छंद, कमजोर व निष्क्रिय गुणांमुळे स्त्रीवाचक स्त्री वाचक मानल्या जातात. |
| २अ. | उत्तरी राशी | राशीचक्रातील प्रथम ६ राशी (मेष, वृषभ, मिथुन, कर्क, सिंह, कन्या) या उत्तरी राशी मानल्या जातात, कारण रव मध्य रेषेच्या उत्तरेस असतात (उत्तर गोलार्ध). | राशीचक्रातील प्रथम ६ राशी (मेष, वृषभ, मिथुन, कर्क, सिंह, कन्या) या रव मध्य रेषेच्या उत्तरेस असतात (उत्तर गोलार्ध). |
| २ब. | दक्षिणी राशी | राशीचक्रातील बाकी सहा राशी (तुळ,वृश्चिक, धनु, मकर, कुंभ, मीन) दक्षिणी राशी मानल्या जातात | राशीचक्रातील या राशी (तुळ,वृश्चिक, धनु, मकर, कुंभ, मीन) रव मध्य रेषेच्या दक्षिणेस असतात. (दक्षिण गोलार्ध). |
| २क. | विषुवीय राशि | मेष व तुळ या विषुवीय राशी आहेत. मेष वसंत संपात व तुळ हि शरद संपात राशी आहे. | संपात याचा अर्थ दिवस व रात्र बरोबर असणे. सूर्य रव मध्य रेष व क्रांतीवृत्त जेथे एकमेकाना छेडतात, त्या बिंदुपासून मेष राशीचा प्रारंभ होतो व मीन राशि समाप्त होते. व तो बिन्दु जेथे कन्या राशि समाप्त होते व तुळ राशी प्रारंभ होते, तेव्हा जगभर दिवसरात्र समान असतात. हि स्थिती २३ मार्च व २३ सप्टेंबर च्या आसपास वर्षातून दोन वेळा येते. |

| | | | |
|---|---|---|---|
| २ड. | अयन वृत्तिय राशि | कर्क व मकर या अयन वृत्तिय राशि आहेत. यांना काही ठिकाणी अनुक्रमे ग्रीष्म आयन राशी व शीत अयन राशी म्हटले जाते. | जेव्हा सूर्य कर्क राशीच्या प्रारंभ विन्दुवर असतो तो दिवस सर्वात मोठा असतो व मकर राशीच्या प्रारंभ बिन्दु वर असतो, ती रात्र सर्वात मोठी असते. सायन प्रणाली अनुसार सूर्य मकर राशिमध्ये सूर्य २२ डिसेंबर च्या आसपास प्रवेश करतो. निरयन प्रणालीमध्ये स्थिर राशी चक्र तारखा निरनिराळ्या असतात. |

जर लग्नरास पुरुष राशि असेल व अन्य गोष्टी देखिल सहाय्यक असतील तर एखाया आधुनिक परिवारा मध्ये जन्मलेली स्त्री देखिल पुरुष स्वरूपाची वाढते. पण पुरुष लग्न राशिमध्ये एखादा अमूक स्त्री ग्रह बसला असेल तर अथवा लग्नेश स्त्री राशि असेल तर स्त्रियोचित गुणवाला पुरुष असतो.

जर ५ व्या स्थानाचा भावारंभ पुरुष राशी असेल व पंचमेश पुरुष ग्रह असून पुरुष राशि मध्ये स्थित असेल तर अधिकांश अपत्ये पुरुष लिंगी असतात अथवा स्त्री राशि असल्यास अपत्ये स्त्री लिंगी असतात. हा सामान्य नियम आहे.

लग्नाचे भावारंभी सकारात्मक राशि चेतना देते व नकारात्मक राशि इतकी बलवान नसते जोपर्यन्त बळी पुरुष ग्रह लग्नस्थानाच्या जवळ नसतील.

संकलक : ज्योतिष मित्र मिलिंद (7058115947)

ज्योतिष मित्र मिलिंद